अधिव्याख्याता, रसायनशास्त्र, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन सेवा, गट-अ या पदावर नामनिर्देशनाने नियुक्तीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
***शासन निर्णय क्र एससीटी- ६५११/(८०/११)/तांशि-७,***
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०००३२.**
**दिनांक :- ०५/०१/२०१२**

संदर्भ :- महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे क्र.१५(२)(२२९)/९०७२/सात-अ, दि. १८/०६/२०११ चे पत्र.

**शासन निर्णय :-** महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत खालील उमेदवारांची अधिव्याख्याता, रसायनशास्त्र, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन सेवा, गट-अ या पदावर त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या रकान्यात ते ज्या दिनांकापासून त्यांच्या पदाचा कार्यभार स्विकृत करतील त्या दिनांकापासून दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीसाठी स्थानापन्न नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ. क्र. | गुणवत्ता क्रमांक | आयोगपुरस्कृत उमेदवाराचे नाव | वर्गवारी | आयोगाने शिफारस केलेला प्रवर्ग | नियुक्तीचे ठिकाण | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. | ७. |
| १ | ४ | श्रीमती. शिवलिला रेवणसिध्दी ख्याडे | अराखीव (म) | अराखीव (म) | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| २ | ५ | श्रीमती. संपदा विजयशंकर बेट्टीगिरी | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |
| ३ | ६ | श्रीमती अश्विनी विश्वनाथ जाधव | अराखीव (म) | अराखीव (म) | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, तासगांव येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | वैद्यकीय तपासणी अहवालाच्या अधिन राहून |
| ४ | ७ | श्री. देवराव गंगाधर कोल्हटकर | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, हिंगोली येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |
| ५ | ८ | श्रीमती सारिका गणपत दुटाळ | अराखीव (म) | अराखीव (म) | शासकीय तंत्रनिकेतन, अंबड येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ६ | ९ | श्रीमती खान रेश्मा बाज मोहम्मद | अराखीव (म) | अराखीव (म) | शासकीय निवासी महिला तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे रिक्त पदावर | ----- |
| ७ | १० | श्रीमती स्मिता अशोक पेटकर | अ.जा. (म) | अराखीव (म) | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर येथे रिक्त पदावर | ----- |
| ८ | १२ | श्रीमती मुद्रीका मुनीरबक्स बक्स | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, साकोली येथे रिक्त पदावर | ----- |
| ९ | १३ | श्री. देवेंद्र किशोरीलाल बोरीकर | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, गडचिरोली येथे रिक्त पदावर | ----- |
| १० | १४ | श्री. धैर्यशील शंकरराव साळुंखे | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन कराड येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |
| ११ | १५ | श्रीमती स्वाती दिगंबरराव देशमुख | अराखीव (म) | अराखीव (म) | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे रिक्त पदावर | ----- |
| १२ | १६ | श्रीमती. शुभागी लक्ष्मण सायरे | वि.मा.प्र. | वि.मा.प्र | शासकीय तंत्रनिकेतन, अमरावती येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| १३ | १७ | श्री. मुकुंद धोंडीराज मोटेगांवाकर | अराखीव अपंग | अपंग एका पायाने अधु | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे रिक्त पदावर | वैद्यकीय तपासणी अहवालाच्या अधिन राहून |
| १४ | १८ | श्रीमती बबिता भगेंद्रसिंह कपुर | अराखीव | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, ब्रम्हपूरी येथे रिक्त पदावर | ----- |
| १५ | १९ | श्रीमती कोमल विष्णु मानकर | इ.मा.व. (म) | अराखीव (म) | शासकीय तंत्रनिकेतन, अवसरी येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |
| १६ | २० | श्रीमती शितल आनंद काकडे | अ.जा. (म) | अ.जा. (म) | शासकीय तंत्रनिकेतन, मुर्तिजापूर रिक्त असलेल्या अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र)येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| १७ | २१ | श्रीमती मेघा पुरुषोत्तमराव राऊत | इ.मा.व. (म) | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, यवतमाळ येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| १८ | २२ | श्री. राम गोविंद शिंदे | भ.ज. (ड) | अराखीव | शासकीय तंत्रनिकेतन, कराड येथे रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अहवालाच्या अधिन राहून |
| १९ | २४ | श्रीमती ललिता गजानन सुलतान | इ.मा.व. (म) | इ.मा.व. (म) | शासकीय तंत्रनिकेतन, खामगांव येथे रिक्त पदावर | ----- |
| २० | २५ | श्रीमती कामना महादेवराव येवले | इ.मा.व. (म) | इ.मा.व. (म) | शासकीय तंत्रनिकेतन, आर्वी येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| २१ | २६ | श्रीमती प्रियंका नामदेव कांबळे | अ.जा. (म) | अ.जा. (म) | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| २२ | २७ | श्री. आशिषकुमार दामोदरराव बनसोड | अराखीव | अराखीव खेळाडू उमेदवार उपलब्ध नसल्याने त्या वर्गवारीसाठी राखीव असलेल्या एका पदाऐवजी | शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | वैद्यकीय तपासणी अहवालाच्या अधिन राहून |
| २३ | २८ | श्रीमती लिना माणिक खडके | इ.मा.व. (म) | इ.मा.व. | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई येथे रिक्त पदावर | ----- |
| २४ | ३० | श्रीमती रिना पारुदास खंदारे | अ.जा. (म) | अ.जा. | शासकीय तंत्रनिकेतन, मुंबई येथे रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |
| २५ | ३१ | श्री. सुमित विलासराव जाधव | इ.मा.व. | इ.मा.व. | शासकीय तंत्रनिकेतन, धुळे येथे रिक्त पदावर | वैद्यकीय तपासणी अहवालाच्या अधिन राहून |
| २६ | ३२ | श्रीमती सारीका नागनाथ गायकवाड | वि.जा. (अ)(म) | वि.जा. (अ) (म) | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम येथे रिक्त पदावर | ----- |
| २७ | ३३ | श्री. प्रशातकुमार भाऊरावजी सरोदे | भ.ज. (क) | भ.ज.(क) | शासकीय तंत्रनिकेतन, जालना येथे रिक्त पदावर | ----- |
| २८ | ३४ | श्रीमती शुभांगी नारायणराव कोटकर | इ.मा.व. (म) | इ.मा.व. | शासकीय तंत्रनिकेतन, गोंदिया येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | ----- |
| २९ | ३५ | श्रीमती मोनिका शंकरराव राठोड | वि.जा. (अ)(म) | वि.जा. (अ) | शासकीय तंत्रनिकेतन, नागपूर येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | ----- |



सुटपारठाकर

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० | ३६ | श्री. चंद्रकांत दाजीबा घुगरे | इ.मा.व. | इ.मा.व. | शासकीय तंत्रनिकेतन, वाशिम येथे कंत्राटी अध्यापकाच्या बदलीने रिक्त पदावर | ----- |
| ३१ | ३७ | श्री. संदिप महादेव आगवणे | अ.जा. | अ.जा. | शासकीय तंत्रनिकेतन, विक्रमगड येथे अधिव्याख्याता विज्ञान (रसायनशास्त्र) या रिक्त पदावर | ----- |
| ३२ | ३८ | श्री. अमोल हरीदास काटेगांवकर | अ.जा. | अ.जा. | शासकीय तंत्रनिकेतन, मालवण येथे रिक्त पदावर | ----- |
| ३३ | ३९ | श्रीमती. साऊबाई बाबा वाक्षे | भ.ज. (क) (म) | भ.ज.(क्र) (म) | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे रिक्त पदावर | ----- |
| ३४ | ४१ | श्री. प्रशांत भानुदासजी चौके | अ.ज. | अ.ज. | शासकीय तंत्रनिकेतन, अहमदनगर येथे रिक्त पदावर | ----- |
| ३५ | ४२ | श्री. संभाजी उत्तम ठाकरे | अ.ज. | अ.ज. | शासकीय तंत्रनिकेतन, नंदुरबार येथे अधिव्याख्याता (रसायनशास्त्र) रिक्त पदावर | चारित्र्य पडताळणी अहवालाच्या अधिन राहून |

२. उपरोक्त सर्व मागासवर्गीय उमेदवारांची जात वैधता पडताळणी झाली असून त्यांचा जाती दावा वैध ठरविण्यात आला आहे.

३. सदर उमेदवारांपैकी अ.क्र. ०६,१७,२७ व ३१ येथील ०४ उमेदवार वगळता उर्वरीत उमेदवारांना वैद्यकीय मंडळाने वैद्यकीयदृष्ट्या शासकीय सेवेत पात्र ठरविले आहे. तशी नोंद त्यांच्या सेवापुस्तकात घेण्यात यावी. उपरोक्त अ.क्र. १७,२७ व ३१ येथील ०३ उमेदवाराने महाराष्ट्र नागरी सेवा(सेवेच्या सर्वसाधारण शर्ती)नियम,१९८१ मधील नियम ११(१) अन्वये नियुक्ती होण्यापूर्वी किंवा नियुक्तीच्या तारखेपासून त्याची सहा महिन्याची सेवा पूर्ण होण्यापूर्वी, यापैकी जे अगोदर घडेल त्याप्रमाणे आरोग्याबद्दलचे **वैद्यकीय प्रमाणपत्र** दाखल करणे बंधनकारक राहील, या अटीच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे. उपरोक्त अ.क्र. १७,२७ व ३१ येथील ०३ उमेदवारांने वैद्यकीय प्रमाणपत्र नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत सादर करावे अन्यथा सहा महिन्याचा कालावधी नंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर उमेदवारांपैकी अ.क्र. ०५,०७,०८,१४,१९,३० व ४२ येथील ०७ उमेदवारांचा साक्षांकन नमुना पोलीसांकडून शासनास प्राप्त झालेला नाही. सदर उमेदवारांची नियुक्ती सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. चापअ-१००८/प्र.क्र.२१४/०८/१६-अ, दि. ९/१/२००९ मधील तरतुदीनुसार चारित्र्य पडताळणी ६ महिन्यात सादर करण्याच्या व या आदेशातील परिच्छेद ५(७) अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

५. सदर उमेदवाराची अधिव्याख्याता, रसायनशास्त्र, शासकीय तंत्रनिकेतन, महाराष्ट्र तंत्रनिकेतन शिक्षक सेवा, गट-अ या पदावर ते प्रत्यक्ष हजर झाल्याच्या दिनांकापासून, नामनिर्देशनाने, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून नियुक्ती करण्यात येत आहे:-



कार्यासन

१) सदर उमेदवारांची वेतनश्रेणी रु १५६००-३९१०० या पे बँड व उच्च व तंत्रशिक्षण विभाग शासन निर्णय, क्र. एसपीसी-२०१०/(३४/१०) /तांशि-२, दिनांक २०/०८/२०१० मध्ये नमूद एजीपी मध्ये राहील.

२) सदर वेतनश्रेणीव्यतिरिक्त शासन वेळोवेळी ठरवेल त्या दराने महागाई भत्ता, घरभाडे भत्ता व स्थानिक पूरक भत्ता अनुज्ञेय राहील.

३) सदर उमेदवारांना प्रथम वेतनवाढ परिवीक्षा कालावधीतील एक वर्ष पूर्ण झाल्यानंतर देण्यात येईल व त्यानंतरची वेतनवाढ परिवीक्षा कालावधी समाधानकारकरीत्या पूर्ण केल्यानंतर मिळेल.

४) सदर उमेदवारांचे परिवीक्षा कालावधीतील काम किवा वर्तणूक अयोग्य, अपेक्षित दर्जाचे अथवा अनुरुप असमाधानकारक आढळल्यास त्यांची सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यास अथवा सेवेतून कमी करण्यास पात्र ठरतील.

५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण२०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.७/८/२००० अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरीता संगणक हाताळणी /वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता म्हणून निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दि.१९/३/२००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र **नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत** उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहीत मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येतील.

६) सदर उमेदवारांची नियुक्ती सरळ सेवाप्रवेश नियुक्तीसाठी विहीत केलेल्या नियमाच्या अधीन राहून ते यापूर्वी हिंदी व मराठी भाषेच्या परीक्षा उत्तीर्ण झालेले नसल्यास किवा त्या परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसल्यास त्या परीक्षा त्यांना विहीत मुदतीत उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तसे न झाल्यास त्यांची वेतनवाढ रोखून ठेवण्यात येईल.

७) उपरोक्त नमूद अ.क्र. ०५,०७,०८,१४,१९,३० व ४२ येथील ०७ येथील उमेदवाराची चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी नियुक्तीच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावी अन्यथा सहा महिन्याच्या कालावधीनंतर सदर नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच त्यांचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणीचा अहवाल असमाधानकारक असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता एक महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

८) सदर उमेदवारांचे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा(वेतन) नियम १९८१ मधील तरतुदींनुसार निश्चित करण्यात यावे.

९) परिच्छेद-१ मध्ये नमूद केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर निर्देशिलेल्या पदावर आदेशाच्या दिनांकापासून **एक महिन्याच्या आत** तात्काळ रुजु व्हावे. सदर विहीत मुदतीत जर त्यांनी नियुक्ती स्विकारली नाही तर आयोगाने घेतलेल्या परीक्षेत त्यांनी मिळविलेल्या गुणवत्ताक्रमानुसार त्यांना अनुज्ञेय असलेली ज्येष्ठता मिळणार नाही. शिवाय प्रस्तुत नियुक्तीच्या संदर्भात त्यांनी वरील मुदतीत काहीही कळविले नाही तर त्यांचे नांव, कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्या नियुक्तीचे सदरचे आदेश रद्द करण्यात येतील.

१०) सदर उमेदवारांना वित्त विभाग शासन निर्णय क्र.अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि.३१/१०/२००५ अन्वये निर्धारित केलेली नवीन परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना (Defined Contribution Pension Scheme) लागू ठरेल.

११) सदर उमेदवारांचे प्रचलित नियमानुसार सेवानिवृत्तीचे वय ५८ राहील.

१२) सदर उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी उपस्थित राहण्यासाठी प्रवासभत्ता देण्यात येणार नाही.



मुद्रा/२०१४

१३) सदर उमेदवारांनी नोकरी सोडण्यापूर्वी शासनास एक महिन्याची पूर्वसूचना देणे अथवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक आहे.

७. हे आदेश प्राप्त होताच संबधीत उमेदवारांनी नियुक्तीच्या ठिकाणी हजर व्हावे व त्याबाबतचा अहवाल संबंधीत संस्थाप्रमुखांकडे सादर करावा. संस्थाप्रमुखांनी याबाबतचा अहवाल संचालकांमार्फत शासनास सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सुहेपाटणकर

( सु. हे. पाटणकर)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रति,
संबंधित उमेदवार

प्रत,
मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव
मा.सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग यांचे स्वीय सहाय्यक
प्र.संचालक, तंत्रशिक्षण, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राव्दारे)
संबंधित विभागीय सहसंचालक, तंत्र शिक्षण (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत)
संबधीत संस्थाप्रमुख (तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत) (वरील उमेदवाराच्या शैक्षणिक तसेच इतर मूळ प्रमाणपत्रांची तपासणी संस्थाप्रमुखांनी स्वत: करावी व सदर उमेदवारांना हजर करुन घ्यावे व त्याबाबतचा अहवाल प्र. संचालक, तंत्रशिक्षण, मुंबई यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. तसेच संबंधित संस्थाप्रमुखांनी या आदेशातील अ.क्र. ०६,१७,२७ व ३१ येथील ०४ उमेदवारांची वैद्यकीय प्रमाणपत्र आणि अ.क्र. ०५,०७,०८,१४,१९,३० व ४२ येथील ०७ उमेदवाराचे चारित्र्य व पूर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र या आदेशापासून सहा महिन्यात प्राप्त करुन त्याबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, तंत्रशिक्षण यांच्यामार्फत शासनास तात्काळ सादर करावा. )
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवासी लेखाधिकारी, मुंबई
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा)१/२, मुंबई/नागपूर.
संबधीत जिल्हा कोषागार अधिकारी.
निवड नस्ती.